महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

Email- ddadm.des@hotmail.com, dydiradm.des@maharashtra.gov.in    022-26383016/022-26383009

क्रमांक :- सेवापरत/राशिशि/सांस/२०२१/प्र.क्र.२५/प्रशा-२ /६५४    दिनांक :- ११/०६/२०२१

परिपत्रक

विषय :- मा.मंत्री आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती / उसनवारी तत्वावरील नियुक्तीबाबत...

अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अधिकारी/कर्मचारी शासनाची/संचालनालयाची पूर्व परवानगी न घेता परस्पर मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांचे कार्यालयात उसनवारी तत्वावर/प्रतिनियुक्तीने रुजू होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन/रजा इ. अदा करण्यास विलंब तसेच अडचणी उद्भवल्या आहेत. सदर बाब विचारत घेवून अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, संचालनालयाच्या सेवेतून मा.मंत्री आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती/उसनवारी तत्वावरील नियुक्तीसाठी रुजू होण्यापूर्वी तसेच प्रतिनियुक्ती/उसनवारी तत्वावरील नियुक्तीसाठी कार्यमुक्त केल्यानंतर खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील एखादा कर्मचारी मा.मंत्री / राज्यमंत्री महोदयाच्या आस्थापनेवर जाण्यास इच्छुक असेल अथवा मा.मंत्री / राज्यमंत्री महोदयांनी नियुक्ती करण्याबाबत कळविले असेल तर सदर कर्मचाऱ्याने मा.मंत्री महोदयांच्या आस्थपनेवर रुजु होण्यापूर्वी संचालनालयाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. संचालनालयाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही कर्मचाऱ्याला परस्पर कार्यमुक्त करण्यात येऊ नये.

२. एखाद्या कर्मचाऱ्याच्या सेवा परस्पर अधिग्रहीत करण्यात आल्यास सदर कर्मचाऱ्याने कार्यमुक्त होणेपूर्वी मुख्य कार्यालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे. मुख्य कार्यालयास न कळविता व कार्यमुक्त न होता कर्मचारी परस्पर मा.मंत्री / राज्यमंत्री कार्यालयात रुजू झाल्यास व त्यामुळे सेवाविषयक बाबी संदर्भात अडचणी उद्धवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्याची राहील.

३. मा.मंत्री / राज्यमंत्री आस्थापनेवरुन अधिकारी/ कर्मचाऱ्यास कार्यमुक्त केल्यानंतर सदर कर्मचाऱ्यास अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या मुख्य कार्यालयात रुजू होणे बंधनकारक आहे. संचालनालयात रुजू झाल्यानंतर सदर कर्मचाऱ्याच्या पदस्थापनेबाबत संचालनालयाच्या स्तरावरुन निर्णय घेण्यात येईल. असे अधिकारी/कर्मचारी परस्पर प्रतिनियुक्ती/उसनवारी तत्वावर जाण्यापूर्वीच्या कार्यालयात रुजू होण्यासाठी गेल्यास त्यांना रुजू करुन घेवू नये.

कृ.मा.पहा....

२. कार्यालय प्रमुख/ शाखा प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(र. र. शिंगे)
संचालक
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुंबई.

प्रत :-
१. अपर संचालक (सर्व), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२. सहसंचालक (सर्व), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
३. सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, नागपूर/अमरावती/ औरंगाबाद/नाशिक /पुणे/ कोकण यांनी सदर परिपत्रक आपल्या विभागातील अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.
४. उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे /कोकण.
५. कक्ष अधिकारी (का. १४२७) / (का. १४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, (सर्व).
७. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा मानव विकास समिती, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व).
८. उप संचालक (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
९. प्रशासन शाखा-१/२/३/४, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
१०. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, (सर्व).
११. निवड नस्ती.